# यावल महाविद्यालयात विभाजन विभिषिका स्मृतिदिन साजरा

यावल (प्रतिनिधी)- येथील जळगाव जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विभाजन विभिषिका स्मृतिदिन निमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख अतिथी म्हणून डॉ. अनिल पाटील उपस्थित होते तर अध्यक्षस्थान डॉ संध्या सोनवणे यांनी भूषविले.

डॉ. अनिल पाटील यांनी फाळणीच्या संदर्भातील *एक वेदनादायी फाळणीची घटना* या विषयावर सविस्तर माहिती दिली. यावेळी त्यांनी विचार व्यक्त केली की 1947 साली जी जाती - धर्मामुळे जखम निर्माण झाली. ती पुन्हा कोणत्याही देशात निर्माण होऊ नये याची काळजी प्रत्येकाने घेणे गरजेचे आहे. अध्यक्षीय भाषणात डॉ. संध्या सोनवणे यांनी मार्गदर्शन केले की हजारोंच्या बलिदानामुळे देश स्वतंत्र झाला आहे, ते स्वातंत्र्य टिकवणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोज पाटील यांनी केले तर आभार प्रा. एम. डी. खैरनार यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपप्राचार्य प्रा. ए. पी. पाटील, डॉ. सुधा खराटे, डॉ. एस. पी. कापडे, डॉ. आर. डी. पवार, डॉ. पी. व्ही. पावरा, मिलिंद बोरघडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.


कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, यावल
अध्यक्ष – प्राचार्या डॉ. संध्या सोनवणे